*कृपया प्रसिद्धीसाठी* **13 डिसेंबर 2010**

**भाजपा नेते आणि माजी केंद्रीय मंत्री श्री. राम नाईक यांनी सोमवार, दि. 13 डिसेंबर 2010 रोजी पुणे येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

***कुष्ठरोगाचे अद्यापही निर्मूलन नाही म्हणून सशक्तीकरण धोरण गरजेचे : राम नाईक***

**पुणे, सोमवार :** कुष्ठरोगाचे अद्यापही देशातून निर्मूलन झाले नसून गेल्या दीड वर्षांमध्ये सव्वा लाखाहूनही अधिक नवे रुग्ण मिळाले आहेत. जगतील एकूण कुष्ठपीडितापैकी 54 टक्के लोक भारतात आहेत. रोगाची व्याप्ती व सामाजिक दृष्टीकोन लक्षात घेता जुलै 2011 पर्यंत सरकारने कुष्ठपीडितांचे सर्वेक्षण पूर्ण करुन त्यांच्या सशक्तीकरणासाठी नवे धोरण आखले पाहिजे, असा अहवाल राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीने नुकताच दिला आहे. भाजपा नेते आणि माजी केंद्रीय मंत्री श्री. राम नाईक व इतरांनी दाखल केलेल्या मूळ याचिकेच्या संदर्भात देण्यात आलेल्या या संपूर्ण अहवालाची तातडीने अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी मागणी श्री. नाईक यांनी आज पुणे येथे केली. ते आज पुण्यात इंटरनॅशनल लेप्रसी युनिअनद्वारा आयोजित 19 देशांच्या दोन दिवसांच्या कार्यशाळेच्या समारोप करण्यासाठी आले होते, त्यावेळी पत्रकार परिषदेत बोलत होते.

देशभरातील कुष्ठपीडितांच्या समस्या दूर करण्यासाठी तसेच कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणासाठी माजी केंद्रीय मंत्री श्री. राम नाईक, इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे डॉ. शरद गोखले, नॅशनल फोरम ऑफ लेप्रसी अॅफेक्टेड फोरमचे सुप्रसिद्ध डॉ. पी.के. गोपाल, कुष्ठरोग निवारण समितीचे श्री. उदय ठकार, श्री. भिमराव मधाळे, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे श्री. शांताराम भोईर आदींनी 5 डिसेंबर 2007 रोजी राज्यसभेचे खासदार कै. वेदप्रकाश गोयल यांच्यामार्फत संसदेकडे विनंती अर्ज केला होता. त्याबाबत खासदार श्री. व्यंकैय्या नायडू यांच्या अध्यक्षतेखालील विनंती अर्ज समितीने 24 ऑक्टोबर 2008 रोजी संसदेच्या पटलावर आपला अहवाल सादर केला होता. आता सदर अहवालावरील कारवाईचा अहवाल समितीचे विद्यमान अध्यक्ष खासदार श्री. भगत सिंह कोश्यारी यांनी नुकताच 22 नोव्हेंबर रोजी संसदेत सादर केला. या अहवालाबाबत श्री. नाईक यांनी विस्तृत माहिती दिली.

..2..

विनंती अर्ज समितीने आपल्या आधीच्या अहवालात सरकारने कुष्ठपीडितांचे सर्वेक्षण करुन त्यांच्या सशक्तीकरणासाठी नवे राष्ट्रीय धोरण आखावे अशी शिफारस केली होती. त्यानुसार झालेल्या सर्वेक्षणाचा तपशील धक्कादायक असून देशातून अद्यापही कुष्ठरोगाचे निर्मूलन झाले नसल्याचे लक्षात आले आहे. एप्रिल 2008 ते 30 सप्टेंबर 2009 पर्यंत अवघ्या दीड वर्षाच्या कालावधीत देशात कुष्ठरोगाचे 1,34,184 नवे रुग्ण आढळून आले आहेत. हे सर्वेक्षण अद्याप पूर्ण व्हायचे आहे. त्यामुळे ते काही झाले तरी जुलै, 2011 पर्यंत पूर्ण करावे तसेच कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणाबाबत राष्ट्रीय धोरण आखण्यात यावे अशी स्पष्ट शिफारस समितीने केली आहे.

याचिका समितीने केलेल्या अन्य महत्त्वाच्या शिफारशींची माहिती देताना श्री. नाईक म्हणाले," सध्या ज्या कुष्ठपीडितांना रोगामुळे 40 टक्क्यांहून अधिक अपंगत्व आले आहे त्यांनाच अन्य अपंगांना मिळणा-या सोयी - सवलती मिळतात. तथापि, कुष्ठरोगाबाबत असलेला सामाजिक घृणेचा दृष्टीकोन अद्यापही बदलला नसल्याने कोणत्याही कुष्ठपीडिताला उदरनिर्वाह करता येणे अशक्य होते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सर्व कुष्ठपीडितांना अपंगत्वाच्या सोयी - सवलती द्याव्यात, एवढेच नव्हे तर कुष्ठपीडितांना सध्या मिळणारा तुटपुंजा निर्वाह भत्ता वाढवून प्रति व्यक्ति प्रति महिना रु. 2,000 /- द्यावेत. कुष्ठपीडित वसाहतींमध्ये राहाणा-या कुष्ठपीडितांना मानवतेच्या दृष्टीकोनातून दारिद्रय रेषेखालील मानून सदर योजना व अंत्योदय योजनेनुसार अत्यल्प दरात अन्नधान्य द्यावे अशी स्पष्ट शिफारस समितीने केली आहे. याशिवाय कुष्ठपीडित जर वाहन चालविण्यासाठी सक्षम असेल तर तो कुष्ठपीडित आहे या कारणाने त्याला वाहनचालक परवाना नाकारु नये अशीही शिफारस समितीने केली आहे"

कुष्ठपीडितांच्या वसाहतींनी दर आठवड्याला प्रत्यक्ष भेट देऊन वैद्यकीय सोयी, सुविधा पुरविण्याचा आग्रह समितीने आपल्या अहवालात धरला असून कुष्ठपीडितांना इंदिरा आवास योजनेअंतर्गत मोफत घरे मिळावीत तसेच त्यांना राजीव कुटीर ज्योती योजने अंतर्गत मोफत वीज देण्याची शिफारस केल्याचेही श्री. नाईक यांनी सांगितले. "कुष्ठपीडितांच्या मुलांकडेही समाज मोकळ्या मनाने पाहात नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन त्यांच्यासाठी वेगळ्या शाळांची सोय करण्यात यावी. तसेच त्यांना उच्च व तंत्र शिक्षणही मोफत द्यावे जेणेकरुन ती स्वावलंबी बनतील याकडे लक्ष पुरविण्याची गरज असल्याची शिफारस समितीने केली आहे. एवढेच नव्हे तर बालसुधार गृहात या मुलांना वेगळे ठेवले जाणार नाही याची खबरदारी घेण्याचा आग्रहही समितीने धरला आहे", असेही श्री. नाईक यांनी सांगितले.

"याखेरीज देशातील विविध कायद्यांमध्ये परिवर्तन करण्याची गरज समितीने आपल्या शिफारशींमध्ये नमुद केली आहे. हिंदु, मुस्लिम, भारतीय ख्रिश्चन यांचे विवाह व घटस्फोट विषयक कायदे व हिंदु दत्तक कायदा आदींमध्ये सुधारणा करण्याबाबतच्या समितीच्या शिफारशींबाबत विधी मंत्रालयाने कोणताही प्रतिसाद दिला नाही याचीही गंभीर नोंद समितीने अहवालात केली आहे. तसेच हे सर्व कायदे सहा महिन्यांच्या आत सुधारण्याची शिफारस समितीने केली आहे. याशिवाय मुंबई महापालिका कायदा तसेच मुंबई भीक मागणे प्रतिबंध कायदा यांच्यातही महाराष्ट्र सरकारने सुधारणा करण्याची शिफारस समितीने केली आहे. प्रसिद्धी माध्यमांद्वारा कुष्ठपीडितांचा समाजाने स्वीकार करावा यासाठी विशेष प्रयत्नांवर भर द्यावा असे ही अहवालात सुचविले आहे." अशी माहिती श्री. नाईक यांनी दिली.

समितीच्या सर्व शिफारशींची केंद्र सरकारने तातडीने अंमलबजावणी करुन लवकरात लवकर कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणासाठी राष्ट्रीय धोरण आखावे, अशी मागणीही श्री. नाईक यांनी केली.

**(कार्यालय सचिव)**

**विशेष सूचना : राज्यसभेचा संपूर्ण अहवाल www.ramnaik.com या वेबसाइटवर Press Release स्तंभामध्ये उपलब्ध आहे.**